# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### अकोला जिल्ह्यातील रोहयो कामांचा कृती आराखडा तयार करणेबाबत

**(१) ४८ (०९-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील रोहयोअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत जिल्ह्यातील कामांचा कृती आराखडा तयार करण्यासाठी जिल्ह्यातील सातही पंचायत समित्यांकडून, गटविकास अधिकाऱ्यांकडून तालुका निहाय रोहयो कामांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते परंतु कामांचे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्याचा कृती आराखडा तयार न झाल्याने जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळण्यास विलंब झाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक लोकाभिमुख कामे बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रोहयो कामांचे पंचायत समित्यांकडून, गटविकास अधिकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू प्रस्ताव किती कालावधीमध्ये सादर करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०६-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अकोला जिल्ह्यातील तालुक्यांच्या प्रस्तावांसह केंद्र शासनाने राज्याच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या एकत्रीत प्रस्तावास दिनांक ०४ मार्च २०२५रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### जमिनी वर्ग-१मध्ये रूपांतरित करण्यासाठी किमान तीन वर्षे मुदतवाढ देण्याबाबत

**(२) ४४५ (०७-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शासनप्रदान जमिनीवरील सुमारे तीन हजार गृहनिर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असून शासनाच्या कब्जेहक्क वर्ग-२ आणि भाडेपट्टी जमिनीवरील या संस्थांच्या जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ माहे जानेवारी २०२५ मध्ये देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासनाने दिलेली एक वर्षाची मुदतवाढ रहिवाशांना किमान तीन वर्षांपर्यंत वाढविणे अपेक्षित आहे पण त्यामुळे जीर्ण इमारतींचा पुर्नविकास प्रलंबित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीर्ण इमारतींचा पुनर्विकास करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करणे) नियम, २०२५ दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यान्वये सवलतीच्या दराने आकारावयाच्या अधिमूल्याच्या मुदतीचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे.

तद्नंतर, प्राप्त होणाऱ्या अर्जावर निर्धारित दराने अधिमूल्य आकारून संबंधित गृहनिर्माण संस्थांना भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याची कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महसूल सेवकांना चतुर्थश्रेणीचा दर्जा लागू करण्याबाबत

**(३) ५६९ (०७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महसूल सेवकांना चतुर्थश्रेणीचा दर्जा लागू करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे वरुन ६५ वर्षे करणे, ग्राम महसूल अधिकारी व महसूल सहायक यामध्ये ५०% आरक्षण देण्याच्या प्रमूख मागण्यांसह विविध मागण्यांसाठी महसूल सेवकांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन,२०२४ मध्ये मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/१०/२०२४ अन्वये महसूल विभागातील कोतवालांचे पदनाम बदलून “महसूल सेवक” असे करण्यात आले आहे. महसूल सेवक संवर्गास चतुर्थ वर्ग

वेतनश्रेणी देण्याच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरून मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ३०/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ७/१०/२०२४ अन्वये राज्यातील एकूण १२,७९३ कोतवालांना दिनांक १/०४/२०२६ रोजीपासून सध्या लागू असलेल्या रुपये १५,०००/- इतक्या मानधनामध्ये १० टक्के इतकी वाढ देण्याबाबत तसेच, त्यानंतर दर ३ वर्षांनी त्यांना मिळणाऱ्या एकूण मानधनामध्ये १० टक्के इतकी वाढ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ८/०१/२०१९ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय दिनांक ६/०२/२०१९ अन्वये महसूल विभागांतर्गत असणाऱ्या गट-ड च्या प्रथम नियुक्तीच्या पदांपैकी नियमित पदांमधून २५ टक्के ऐवजी ४० टक्के पदे कोतवालांसाठी राखीव ठेवण्यात यावीत, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून महसूल विभागांतर्गत गट ड पदासाठी स्वतंत्र सेवाप्रवेश नियम शासन अधिसूचना दिनांक ११/१२/२०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आले असून गट-ड मधील पदे ही सरळसेवेद्वारे भरती होत असल्याने महसूल सेवक पदावरील कर्मचाऱ्यांनाही भरती परीक्षा लागू करण्यात आलेली आहे. महसूल सेवक हे पद मानधन तत्वावरील असून त्यांना गट ड पदावरील प्रथम नियुक्तीच्या पदावर ४० % कोटा राखीव ठेवण्यात आला असल्याने ग्राम महसूल अधिकारी व महसूल सहाय्यक या गट क संवर्गातील पदांवर वेगळयाने आरक्षण ठेवता येणार नाही.

---

## सातपूर (ता.सुरगणा, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील ज्योतिष स्ट्रक्चर कंपनीचे आगीमुळे नुकसान झाल्याबाबत

**(४) ५७५ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (ता.सुरगणा, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील ज्योतिष स्ट्रक्चर कंपनीत लागलेल्या आगीत कंपनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत झालेल्या नुकसान भरपाईपोटी कर्मचाऱ्यांना शासनाकडून कोणती मदत करण्यात आली आहे तसेच अशा घटना घडू नयेत यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २०/१२/२०२४ रोजी सदर कंपनीत आग लागली होती.

(२) सदर दुर्घटनेत कोणताही कामगार मृत अथवा जखमी झालेला नाही.

म.औ.वि. महामंडळाच्या सातपुर औद्योगिक क्षेत्रात म.औ.वि. महामंडळाने सन १९७८ मध्ये अग्निशमन केंद्र बांधून सन १९७९ मध्ये सातपुर अग्निशमन केंद्र नाशिक नगरपरिषदेस दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सातपुर अग्निशमन केंद्र नाशिक महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येते.

महाराष्ट्र राज्यात आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ हा कायदा सन २००८ मध्ये अस्तित्वात आला असून त्यानुसार किमान अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शासनाने म.औ.वि. महामंडळास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषीत केले आहे. त्यानुसार कारखान्यांचे नकाशे मंजूर करताना म.औ.वि. महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली व अग्निसुरक्षा अधिनियमात नमुद केल्याप्रमाणे अग्निप्रतिबंधातम्क उपाययोजना सुचवल्या जातात. बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर उपाययोजनांची तपासणी करुन ती योग्य असल्याची खात्री करुन अर्तिम ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. सदर अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना सुस्थितीत ठेवणे सदर कारखान्यांची कायदेशीर जबाबदारी असून अग्निसुरक्षा अधिनियमाप्रमाणे नियूक्त केलेल्या लायस्नस एजन्सीमार्फत सदर अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची तपासणी करुन घेऊन त्यांनी सादर केलेले नमुना-ब प्रमाणपत्र दर वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्यात देणे बंधनकारक आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड-मुंबई विमानसेवा सुरू करण्याबाबत

**(५) ६६२ (२४-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील श्री गुरुगोविंदसिंगजी विमानतळाची सेवा कोरोना महामारीच्या काळात बंद पडल्यानंतर पुन्हा महायुती सरकारच्या काळात सुरू झाली असून नांदेड येथून हैदराबाद, पुणे, तिरुपती इत्यादी ठिकाणची विमान सेवा सुरू झालेली असताना केवळ नांदेड-मुंबई विमानसेवा अद्यापही सुरू झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना महामारीच्या पूर्वी नांदेड-मुंबई विमानसेवेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत असतानाही सदर सेवा सुरु न करण्यात आल्यामुळे नांदेड येथील प्रवाशांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे तसेच नांदेडसह परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधींनी नांदेड-मुंबई विमानसेवा सुरू करण्याबाबत वारंवार केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा व मागणी करूनही अद्याप उक्त विमानसेवा सुरू करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या उक्त मागणीच्या अनुषंगाने नांदेड-मुंबई विमानसेवा तात्काळ सुरू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (१६-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मऔवि महामंडळाने नांदेड येथील विमानतळ, विमानतळाचे अद्यावतीकरण, देखभाल, दुरुस्ती व परिचालनाकरीता मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. यांना हस्तांतरित केले होते तथापि, करारनाम्यातील अटींनुसार प्रकल्प चालविण्यास असमर्थ ठरल्याने सदर विमानतळाचा ताबा दिनांक ०८/०४/२०२५ रोजी मऔवि महामंडळाने परत घेतला असून पुढील परिचालनाकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ लि. यांना हस्तांतरित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जाती आयोग व अनुसूचित जमाती आयोग असे दोन स्वतंत्र आयोग निर्माण करणेबाबत

**(६) ७४१ (०९-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनासंबंधी सर्व विभागांशी समन्वय साधून सामाजिक न्यायाचे तत्व प्रभावीपणे राबविण्यासाठी अनुसूचित जाती/जमातींच्या लोकांच्या मागणींच्या अनुषंगाने शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय सद्यः स्थितीचा अभ्यास करून शासनास उपाययोजना सुचविण्याकरीता सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क. रामाआ-२००३/प्र.क्र.१७५/मावक-१, दिनांक ०१ मार्च, २००५ साली अनुसूचित जाती (५९) जाती, जमाती (४७) जाती यांच्याकरीता एकत्रित आयोग गठीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत देखील दोन स्वतंत्र आयोग अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती राज्यात निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०४-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र अनुसूचित जाती आयोग व अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत अनुक्रमे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत प्रलंबित निधी प्राप्त होण्याबाबत

**(७) ७८९ (१६-०४-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत सन २०२४- २०२५ ह्या चालू आर्थिक वर्षात जिल्ह्यातील विविध प्रस्तावित कामांसाठी रुपये ३०० कोटी एवढा निधी मंजूर झाला झाला असून माहे नोव्हेंबर, २०२४ अखेरपर्यंत शासनाकडून १२० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मंजूर निधी प्रस्तावित विकास कामांकरीता दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी पर्यंत खर्च होणे अपेक्षित असताना उर्वरित १८० कोटी रुपयांचा प्रलंबित निधी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१९-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अकोला जिल्ह्यास उर्वरित १८०.०० कोटी निधीपैकी रुपये ६०.०० कोटी व रुपये १२०.०० कोटी निधी अनुक्रमे माहे जानेवारी, २०२५ अखेर व फेब्रुवारी, २०२५ अखेर बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्थानिक स्वराज्य संस्थेतील रिक्त जागा पोर्टल द्वारे भरण्यापूर्वी कार्यरत शिक्षकांच्या बदल्या समुपदेशाने करणेबाबत

**(८) ८०५ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २१ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामधून स्थानिक स्वराज्य संस्थेतील रिक्त जागा पोर्टलद्वारे भरण्यापूर्वी कार्यरत शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या समुपदेशाने करण्याबाबतचे आदेश शासनाकडून दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेश असतानाही काही जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विनंती वरून बदली मागणाऱ्या शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या नसल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या गैरसोयीच्या ठिकाणी कार्यरत शिक्षकांना जिल्हांतर्गत समुपदेशाने त्यांचे सोईचे ठिकाण बदलीने मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच त्यांना जिल्हांतर्गत बदल्या नाकारणाऱ्या अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१३-०६-२०२५) :** (१), (२) व (३) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २१/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाअंतर्गत बदलीसाठी जे शिक्षक पूर्वीपासून कार्यरत आहेत त्यांच्यापैकी बदली इच्छुक शिक्षकांना त्यांच्या विकल्पानुसार एक संधी देऊन जागा रिक्त असल्यास समुपदेशनाने रिक्त पदी नियुक्ती देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, समानीकरणाचे तत्व तसेच स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन समुपदेशनाने जिल्हांतर्गत बदल्या करण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समुचित कार्यवाही केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव व अमळनेर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांची विभागीय चौकशी करणेबाबत

**(९) ९०७ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १२ नियम ८ अंतर्गत दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन आदेश व स्वतंत्र आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव हे रजा न घेता व शासनाचे पूर्वपरवानगी शिवाय परदेश दौऱ्यावर गेल्याने शिस्तभंगाची कार्यवाही करून गुन्हा दाखल करणे संदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास अपर मुख्य सचिव, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केलेली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) उक्त दोन्ही प्रकरणी संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आली असून एका प्रकरणी चौकशी अधिकारी नियुक्त केला असून चौकशी अहवाल प्रतिक्षाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महामार्गाच्या कामासाठी जमिनी अधिग्रहित करताना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईबाबत

**(१०) ९१३ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महामार्गाच्या कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या जमिनीची नुकसान भरपाई त्या त्या भागातील चालू बाजारभावाच्या दुप्पट दराने देण्याबाबतचा अध्यादेश दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ व दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला असून राज्यातील प्रस्तावित नवीन राष्ट्रीय / राज्य महामार्गामध्ये जाणाऱ्या त्या त्या भागातील कृषी जमिनींसाठी उक्त अध्यादेशातील सुधारित तरतूदी लागू नाहीत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन राष्ट्रीय / राज्य महामार्गांमध्ये जाणाऱ्या कृषी जमिनीसाठी पूर्वीप्रमाणेच चौपट दर देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०७-०५-२०२५) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय/राज्य महामार्ग सन्मुख जमिनींच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक ०५/१०/२०२१ ला अनूसरुन शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०२१ व १४/०१/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे विकास नियोजन क्षेत्रातील आणि प्रादेशिक नियोजन

क्षेत्रातील ज्या जमिनीच्या नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिध्द केलेल्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये बिगर कृषीदर विहित केला आहे. अशी जमीन संपादन प्रकरणी मोबदल्याची रकमेची परिगणना करताना गुणक घटक १ राहील अशी तरतुद करण्यात आली आहे. सदरची तरतुद विचारात घेता कृषी जमिनीसाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनूसार मोबदला देणे अनिवार्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरसाळा व फरकांडा तीर्थक्षेत्र (ता.बोदवड, जि.जळगाव) दरम्यानच्या रस्त्याचे बांधकामास ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(११) ९२३ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरसाळा व फरकांडा तीर्थक्षेत्र (ता.बोदवड, जि.जळगाव) दरम्यान आमदगाव जुनोना रस्त्याचे बांधकाम, दुरुस्ती इ. कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असून वन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राअभावी सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) रस्त्याचे संरेखन (alignment) साठी वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संयुक्त पाहणी करण्यात आलेली आहे. सदर रस्त्याच्या कामाकरीता आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वन विभागाकडून आवश्यक परवानगी प्राप्त करणेबाबत कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांच्याविरुध्द तेथील अधिकारी /कर्मचारी यांनी केलेल्या तक्रारींबाबत

**(१२) ९७३ (१७-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याविरुध्द तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी विशेषत: मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांनी गंभीर स्वरुपाच्या तक्रारी दिनांक ७ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत मुख्य अभियंता तथा सहसचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांना पत्राद्वारे दिनांक ५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा यांनी उक्त अहवाल तातडीने सादर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१६-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नामधील बाब ही कार्यालयीन कामकाजासंदर्भात असून यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद वर्धा यांनी त्यांचे कार्यालयातील संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची प्रत्यक्ष सुनावणी घेऊन कार्यालयीन कामकाज करताना कार्यालयीन वातावरण सकारात्मक राहील याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी तसेच सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे व याबाबत पुनरावृत्ती होणार नाही यांची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी संचालक, लेखा व कोषागारे यांना सादर केला आहे.
तसेच, सदय:स्थितीत मुख्य व लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा या पदावर उपसंचालक संवर्गातील अधिकारी श्री. मनोज वि. पाते यांची शासनाच्या दिनांक ०३/१०/२०२४ च्या आदेशान्वये पदस्थापना करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फुलंब्री (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(१३) १२२५ (०९-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलंब्री (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात ऐन गहू लागवडीच्या काळात विविध प्रकारच्या रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी अडचणीत आले असून जिल्ह्यात १०-२६-२६, डीएपी, १२-३२-१६ तसेच युरिया या चार प्रमुख रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाली असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलंब्री तालुक्यात खतांची टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०५-२०२५) :** (१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रब्बी हंगाम सन २०२४-२५ मधील खत पुरवठा, उपलब्धता, तुटवडा, आणि इतर अनुषंगीक विषयांबाबत मा.खासदार महोदय आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत फुलंब्री तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी युरिया, १०:२६:२६, १२:३२:१६ आणि डिएपीचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आणून दिले.
(२) फुलब्री तालुक्यात रब्बी हंगाम २०२४-२५ साठी खतांचे ९८०० मे.टन आवंटन मंजूर होते. प्रत्यक्षात

एकूण ११९८२ मे.टन खतांचा पुरवठा झालेला आहे. छ.संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुका कृषी अधिकारी यांचेकडून सविस्तर माहिती घेण्यात आली असून फुलंब्री तालुक्यामध्ये सन २०२४-२५ रब्बी हंगामात एकूण मंजूर आवंटनाच्या १२२ टक्के खतांचा पुरवठा झालेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हा नियोजनाला शासनाने दिलेला निधी खर्च करण्याबाबत

**(१४) १३४० (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हा वार्षिक योजनेमधून सन २०२४-२०२५ या वर्षात रुपये ४८६ कोटी एवढ्या रकमेचा निधी जिल्ह्याला मंजूर झाला असून त्यापैकी २११ कोटी रुपये शासनाकडून प्राप्त होऊनही अद्याप पर्यंत केवळ ५८ कोटी रुपयांची विकासकामे हाती घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत निधी खर्च न झाल्यास हा निधी परत जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्हा नियोजनाला शासनाने दिलेला निधी तातडीने खर्च करून मंजूर झालेला उर्वरित निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) अंतर्गत सांगली जिल्ह्यास ४८६.०० कोटी इतका निधी [माहे जानेवारी, २०२५ अखेर व फेब्रुवारी, २०२५ अखेर अनुक्रमे रुपये ३०३.०५ कोटी (६० %) व रुपये १८२.९५ कोटी (४० %)] सन २०२४-२५ मध्ये बिम्स प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) अंतर्गत सांगली जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत रुपये २६४.५५ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अंतर्गत सांगली जिल्ह्यास वितरित केलेल्या रुपये ४८६.०० कोटी (१०० %) निधीपैकी रुपये ४८४.०० कोटी (९९.५८ %) इतका निधी खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरिकांना दिलेली जमीन वन घोषित केल्याने फेरफार होऊ शकली नसल्याबाबत

**(१५) १३५९ (१५-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात महसूल विभागाने १९७२ आणि १९९१ मध्ये ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरिकांना भोगवटा दोनचे शेतीचे पट्टे दिले असून, सदर जमीन वनजमीन म्हणून घोषित केल्याने फेरफार प्रक्रिया अद्याप होऊ शकली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कारणास्तव पिण्याचे पाणी, शेतीचे पट्टे, अकृषक जमिनीची प्रकरणे, घरकुल योजना, उद्योगधंदे, फेरफार, नवीन शेतीचे पट्टे, शाळा इमारत बांधकाम व दुरुस्ती आदी सारख्या विकासकामांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त संदर्भात फेरफार प्रक्रिया होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नसून पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे-
अ) जिवती तालुक्यातील ७/१२ अभिलेखाचे अदयावतीकरण सुरु असून जमाबंदी आयुक्त यांच्या आदेशान्वये फेरफार प्रक्रिया बंद आहे.
ब) मा.प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान मध्ये वरिल तालुक्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात घराघरापर्यंत आरोग्य सेवा पुरवण्यात येते, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संत सावता महाराज समाधी स्थळ श्री क्षेत्र अरण (जि.सोलापूर) या स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर करण्याबाबत

**(१६) १६८२ (१७-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत सावता महाराज समाधीस्थळ श्री क्षेत्र अरण (ता.माढा, जि.सोलापूर) या स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान रुपये १४० कोटी रकमेचा आराखडा बनवून शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संत सावता महाराज समाधी स्थळ श्रीक्षेत्र अरण (जि.सोलापूर) या स्थळाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१८-०६-२०२५) :** (१), (२) आणि (३) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/०९/२०२४ रोजी संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत श्री.क्षेत्र संत शिरोमणी सावता माळी महाराज संजीवनी समाधी, अरण ता.माढा जि.सोलापूर या तीर्थक्षेत्रास " अ" वर्ग दर्जा देण्यात येऊन प्रथम टप्प्यात रुपये २५.०० कोटींच्या विकास कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर तिर्थक्षेत्रास शासन निर्णय क्र. तीर्थवि-२०२५/ई-१०१०२६६/यो-११ दिनांक १३/०५/२०२५ अन्वये "अ" वर्ग दर्जा देण्यात आला आहे. तसेच, याविभागाच्या दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर तीर्थक्षेत्राचा रुपये १०० कोटीचा विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील वाहतूक कोंडी कमी होण्याकरीता उड्डाण पूल बांधण्याबाबत

**(१७) १७२३ (१७-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येचे निराकरण करण्याकरीता तेथे उड्डाण पूल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) येवला तालुक्यात सेतूबंधन योजनेतून LC-७४ धामनगांव भा-हम वाघाळे ते राममा-७५२ जी रस्ता रामा-४१२ सा. क्र. १/०५० LC-७६ येवला नांदगाव पिलाखेड बहाळ भडगाव एरंडोल रस्ता रामा-२५ सा.क्र. किमी ७७/२०० LC-७७ प्रामा-८ ते नांदेसर आडगांव चौथवा उंदीरवाडी बोकटे देवळाणे खामगांव ते प्रामा-२ ला जोडणारा रस्ता ८० वर सा.क्र. ०/०१०, अशा तीन रेल्वे क्रॉसींग (ROB) बांधण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत तसेच प्रकल्पाच्या संयुक्तीक तपासणी व अभ्यास करणेस्तव मध्य रेल्वे, अहमदनगर यांचेसमवेत कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहिल्यानगर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना इमारती व स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्याबाबत

**(१८) १८४४ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील ५३७५ अंगणवाड्यांपैकी १३१० अंगणवाड्यांना इमारती नसून १६५ ठिकाणी स्वच्छतागृहे नसल्यामुळे येथील बालके, महिला व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची मोठ्या

प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अंगणवाड्यांना सर्व सोयी-सुविधा युक्त इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील ज्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा उपलब्ध नाही अशा सुमारे ९६६४ अंगणवाडी केंद्रांना FRP (Fiber reinforcement polymer) तंत्रज्ञानाने तयार केलेले बेबी फ्रेंडली शौचालय आस्थापित करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत आहिल्यानगर जिल्ह्यातील २७३ स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालय आस्थापित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना व अन्य कार्यक्रमामधून अंगणवाडी केंद्रांना सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कंत्राटदारांची देयके थकीत असल्याबाबत

**(१९) १८५१ (१७-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्ते व पूल बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांचे ३८५०० कोटी रुपयांची देयके थकित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदार व विकासकांनी पूर्ण केलेल्या कामांची देयके त्वरित अदा करण्याची मागणी कंत्राटदारांच्या संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०६-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते उपक्षेत्रांतर्गत माहे जानेवारी, २०२५ अखेर विविध योजनेंतर्गत एकूण रुपये १९९२२ कोटीची देयके प्रलंबित होती.
(२) होय.
(३) व (४) रस्ते उपक्षेत्रांतर्गत राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, नाबार्ड, हायब्रीड ॲन्युईटी योजना, रेल्वे सूरक्षा कामे व आशियाई विकास बँक योजनेंतर्गत एकूण रुपये १९९२२ कोटीची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत शिल्लक/अवितरीत तरतुदीतून मार्च, २०२५ मध्ये एकूण रुपये ४३०५ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर निधी वितरीत केल्यानंतर रुपये १५६१७ कोटीची देयके शिल्लक असून सदर प्रलंबित देयके

अदा करण्यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रुपये १४८७५ कोटीची तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. मूळ अर्थसंकल्पीत तरतुदीव्यतिरीक्त अन्य विहित मार्गाने उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील कृषी क्षेत्रात क्रांती घडविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर कृषी क्षेत्रासाठी करण्याबाबत

**(२०) २११८३ (१५-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी क्षेत्रात क्रांती घडविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर कृषीसाठी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यासाठी कृषी विभागाने सहकार विभागासोबत समन्वय करून या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश मा.उपमुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावाबाबतचा आराखडा तयार करण्याबाबत तसेच दिलेल्या निर्देशाबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३०-०५-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १७/०४/२०२५ रोजी सहभागधारकांबरोबर (स्टेकहोल्डर्स) बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यानुषंगाने कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुध्दीमत्ता वापराचे धोरण तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.